## नियमीत दिवाणी दावा क्र. २०५/२००७ मधील नि. क्र. १३४ खालील आदेश

सदरचा दुरूस्तीचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या क्रम ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे.

२. सदरचा अर्ज वाचला, तसेच अर्जासोबतचे शपथपत्र नि.क्र. १३५, प्रतिवादी क्र. ६ तर्फे दिलेले म्हणणे नि.क्र. १३७ आणि प्रतिवादी क्र. २ तर्फे दिलेले म्हणणे नि.क्र. १३९ विचारात घेतले. प्रस्तुच्या अर्जास प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांच्या म्हणण्याविना विचारात घेण्यात येत आहे. वादीचे विधिज्ञ श्री. के. के. गलांडे, प्रतिवादी क्र. २ चे विधिज्ञ श्री. एस. यु. लांडे आणि प्रतिवादी क्र. ६ चे विधिज्ञ श्री. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला असता, माझ्या विचारार्थ खालील मुद्दा निघाला, व त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसासहित मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीने मागणी केलेली दाव्यातील दुरुस्ती/सुधारणा ही वाद मिळकती बाबतचा खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे, हे सिध्द केले काय ? | ... होकारार्थी. |
| २) | काय आदेश? | ... अंतिम आदेशा प्रमाणे. |

### <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :-**

३. वादीचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, यापूर्वी वादीतर्फे दावा दुरूस्तीचा अर्ज नि.क्र. ११५ दाखल केलेला होता व तो मंजूरही झाला होता. परंतु त्यावेळेस वादीस दावा मिळकतीबाबतची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे दाव्यातील परिच्छेद क्र. १ यामध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत तसेच ग्रामपंचायत घर मिळकती ज्या दाव्यात समाविष्ट केलेल्या आहेत त्यांच्याही चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज वादीतर्फे दिलेला आहे. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे व ती दुरूस्ती केल्याने दाव्यात होणा-या हुकूमाच्या अनुषंगाने

वाटपाच्या वेळेस प्रस्तुतच्या दुरूस्तीचा उपयोग होणार आहे त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

४. याउलट, प्रतिवादी क्र. २ चे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने दुरूस्तीचा अर्ज देते वेळेसच त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १३६ दाखल केलेले आहे व त्यामध्ये प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज मंजूर होण्यापूर्वीच त्या दुरूस्तीच्या अनुषंगाने संबंधीत मजकूर पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केलेला आहे. वादीतर्फे यापूर्वी दुरूस्तीचा अर्ज दाखल केलेला होता. त्यावेळेस वादीने योग्य ती काळजी न घेता तो दुरूस्तीचा अर्ज दाखल केलेला होता. त्यामुळे या परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. तसेच प्रतिवादी क्र. ६ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने प्रस्तुतच्या अर्जात दाव्यामध्ये कोठे दुरूस्ती करावयाची आहे, हे नमुद केलेले नाही. दावा मिळकतीच्या चतु:सिमा वादीस पूर्वीपासूनच माहित होत्या परंतु त्या त्यावेळेस दाव्यात का नमुद केल्या नाहीत ? याचे कारण प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेले नाही. वादीने दुरूस्तीचा अर्ज दाखल केला त्याचवेळेस त्याचे पुराव्याचे शपथपत्रही दाखल केलेले आहे. सदरच्या दाव्याची न्यायचौकशी सुरु झालेली असल्यामुळे या परिस्थितीत प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज चालण्यास पात्र नाही. त्यामुळे तो अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६. वादी व प्रतिवादी यांना ही बाब कबूल आहे की, प्रस्तुतचा दावा रे.मु.क्र. २०५/२००७ हा तत्कालीन न्यायीक अधिकारी यांनी दिनांक २०/११/२००९ रोजीच्या न्यायनिर्णयाच्या आधारे खारीज केला. त्या न्यायनिर्णयाच्या विरूध्द वादीने नियमीत दिवाणी अपिल क्र. ०१/२०१० हे मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांच्याकडे दाखल केले होते व ते अपिल दिनांक २०/०१/२०१६ रोजी मंजूर झाले आणि प्रस्तुतच्या दाव्यातील न्यायनिर्णय रद्द करण्यात आला. मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी त्याच आदेशात वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या वाद कथनात दुरूस्ती करण्याची संधी देवून त्यांचा जादाचा तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेवून प्रस्तुतचा दावा सहा महिन्यात गुणदोषावर निकाली काढण्यात यावा, असे आदेशित केलेले आहे.

७. हे कबूल आहे की, वादीने प्रस्तुतच्या दुरूस्तीच्या अर्जात दाव्यातील कोणत्या परिच्छेदामध्ये दुरूस्ती करावयाची आहे, ही बाब नमुद केलेली नाही. हे सर्वज्ञात आहे की, एखाद्या अर्जामध्ये एखादी बाब नमुद केली नसली तरी त्या संपुर्ण अर्जाचे अवलोकन करून कोणत्या बाबीसाठी तो अर्ज दिलेला आहे, हे विचारात घेता येवू शकते. केवळ एखादी बाब अर्जात नमुद केली नाही, या कारणामुळे संबंधीत अर्ज नामंजूर करता येवू शकत नाही. या परिस्थितीत प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले असता निश्चितीत असे निदर्शनास येते की, वादीतर्फे

संबंधीत दुरूस्ती ही दाव्यातील दावा मिळकतीच्या चतु:सिमाच्या अनुषंगाने दुरूस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे व ती दुरूस्ती दाव्यातील परिच्छेद क्र. १ मध्ये करणे वादीस अपेक्षित आहे.

८. हे कबूल आहे की, वादीने प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज नि.क्र. १३४ आणि वादीचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १३६ हे दोन्हीही एकाच दिवशी दिनांक २९/०७/२०१६ रोजी दाखल केलेले आहेत. त्यामुळे अर्ज व पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्याचा क्रम विचारात घेतला तर निश्चितच दाव्याची न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज दिलेला असल्याचे दिसून येते. हे सर्वज्ञात आहे की, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी एखादा दुरूस्तीचा अर्ज दाखल केला गेला तर न्यायालयाने त्यावेळेस सौम्य भूमिका घेणे गरजेचे आहे.

९. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्यात नमुद असलेल्या दावा मिळकतीच्या चतु:सिमा नमुद केल्याने संबंधीत दावा मिळकत ओळखण्यास व त्या मिळकतीच्या चतु:सिमा स्पष्ट होण्यास मदत होणार आहे व ती दुरूस्ती दाव्यातील खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे, व तसे वादीने सिध्द केलेले आहे. प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे या दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) सदरचा दुरूस्तीचा अर्ज नि.क्र. १३४ मंजुर करण्यात येत आहे.

२) वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणेची दुरूस्ती आजपासुन १४ दिवसाच्या आत करावी आणि दुरूस्त दाव्याची प्रत त्वरीत मुदतीत दाखल करावी.

३) प्रतिवादींना त्यांची कैफियत यामध्ये संबंधीत दुरूस्तीच्या अनुषंगाने परिणामकारक दुरूस्ती करावयाची असल्यास, त्याबाबतचा दुरूस्तीचा अर्ज त्वरीत दाखल करावा अन्यथा दुरूस्ती करावयाची नसल्यास तशी पुरसीस दाखल करावी.

(धनंजय भ .हंबीरे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, शेवगांव.

दिनांक :-२४/०८/२०१६.